सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: एमआयएस-०६१५/सीआर-१३/२०२१/तीन दिनांक:- १४ जुलै, २०२१

**-: प्रसिध्दीपत्रक:-**

विषय :- सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा २०२० - पदसंख्या व आरक्षणातील बदलाबाबत
संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०२/२०२०

महाराष्ट्र शासनाच्या गृह (परिवहन) विभागाच्या अधिपत्याखालील सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट-क संवर्गातील भरतीकरीता दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा २०२० ही रविवार दिनांक १५ मार्च, २०२० रोजी घेण्यात आली.

२. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ५ मे, २०२१ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार सदर प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आल्यामुळे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०२०/प्र.क्र.३२०/१६ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये भरतीप्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षित असलेली पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरीत करुन संबंधित परीक्षेची निकाल प्रक्रिया राबविणे क्रमप्राप्त ठरते.

३. प्रस्तुत दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींच्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरित केल्यानंतर विषयांकित सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा २०२० मधून भरावयाच्या एकूण २४० पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित पदे | अराखीव पदे | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | २५ | १६ | ६+३* | ५+२१* | ७+३* | ४ | ३६+१९* | ४+४* | २४ | १७७ | ६३ | २४० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १२ | ८ | ५ | १३ | ४ | २ | २७ | ५ | १२ | ८८ | २८ | ११६ |
| महिला | ८ | ५ | ३ | ८ | ३ | १ | १७ | २ | ७ | ५४ | १९ | ७३ |
| खेळाडू | १ | १ | -- | १ | १ | -- | ३ | -- | १ | ८ | ४ | १२ |
| माजी सैनिक | ४ | २ | १ | ४ | २ | १ | ८ | १ | ४ | २७ | १० | ३७ |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| * अनुशेषाची पदे | | | | | | | | | | | | |

४. उपरोक्त पदसंख्येच्या आधारे विषयांकित सहायक मोटार वाहन निरीक्षक पूर्व परीक्षा २०२० करीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

५. दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

ठिकाण: मुंबई

सहसचिव, परीक्षापूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग